**दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित व त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.**

**(प्रशासकिय विषय)**

**विषय क्रमांक ३३ :-** श्री. आर.बी. ओगले, तत्कालिन सहाय्यक आयुक्त यांना महानगरपालिकेच्या सेवेत रुजु करुन घेण्यास मान्यता मिळण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३३ :-** श्री. आर.बी. ओगले, तत्कालिन सहाय्यक आयुक्त यांना महानगरपालिका अमरावती यांचे विरुध्दच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेला मालमत्ता करामध्ये शिक्षण कर व रोजगार हमी योजना कराची सवलत देऊन पदाचा दुरुपयोग केल्याबाबत शिस्तभंग विषयक कार्यवाही आदेशीत करण्यात आली होती. त्यामध्ये त्यांचेवर ठेवलेले दोषारोप सिध्द झाल्यामुळे श्री. आर.बी. ओगले सहा. आयुक्त यांचेवर शास्ती लादणेपुर्वी त्यांचेवर लादवयाच्या शास्तीस म्हणजे त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करणे व त्यांचा दिनांक १५.१२.२००९ ते ०६.०३.२०१० पर्यंतचा निलंबनकाळ, निलंबनकाळ करणे ही शिक्षा कायम करणे करीता दिनांक १९.०३.२०१६ रोजी होणाऱ्या मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने दिनांक १९.०३.२०१६ रोजी झालेल्या सदर सभेमध्ये अन्वये प्रस्तावित सक्तीची सेवानिवृत्ती मंजुर न करता श्री. राहुल ओगले यांना महानगरपालिकेच्या सेवेत ठेवण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला.

सदर ठराव विखंडन करण्याकरीता कार्यालयाचे पत्र क्र. अमनपा/साप्रवि/आयुक्त ३९२/१६ दि. ०७.०५.२०१६ च्या पत्रान्वये शासनासमोर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ अन्वये पाठविण्यात आला. सदर प्रस्तावास शासनाने शासन निर्णय क्रमांक अमरावती -१६/ प्र.क्र.६२/नवि २६ दि. ०१.०३.२०१७ च्या शासन निर्णयानूसार अमरावती महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठराव क्र ३० दि. १९.०३.२०१६ महानगरपालिकेच्या आर्थिक व प्रशासकिय शिस्तीच्या विरोधात असल्याने सदरचा ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ (३) नुसार अंतिमतः विखंडीत केल्यामुळे कार्यालयाचे आदेश क्र अमनपा/साप्रवि/आयुक्त/३९९९/२०१७ दि. ०४.०३.२०१७ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केले आहे.

सदर आदेशाविरुध्द श्री. आर.बी. ओगले सहा. आयुक्त यांनी मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ मध्ये याचिका क्र. २४१०/२०१७ दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक ०१.०३.२०१८ रोजी सदर याचिकेत महाराष्ट्र शासनाचा दि. ०१.०३.२०१७ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला व त्याच अनुषंगाने दि. ०४.०३.२०१७ रोजीचे आयुक्त महानगरपालिका अमरावती यांनी श्री. राहुल बापुराव ओगले यांना सक्तीने सेवानिवृत्त करणे तसेच दि. १५.१२.२००९ ते ०६.०३.२०१० पर्यंतचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ निलंबन काळ करण्याबाबत पारीत केलेला आदेश सुध्दा रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे श्री. राहुल बापुराव ओगले सहा. आयुक्त महानगरपालिका अमरावती यांनी दि. १६.०३.२०१८ रोजी कामावर रुजु करणेबाबत अर्ज सादर केला.

अर्जाच्या अनुषंगाने विधीतज्ञ यांच मत घेण्यात आले आहे. त्यामध्ये नमुद आहे की, सदर रिट पिटीशन मध्ये विद्यमान उच्च न्यायालयाने हे नमुद केले आहे की, आयुक्त यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर शासन सुनावणी घेण्यास मोकळे असुन त्यामध्ये याचिकाकर्ता म्हणजेच श्री. राहुल ओगले यांची बाजु ऐकुण नव्याने आदेश पारीत करावा व विभागीय चौकशीचा मुद्दा खुला ठेवला आहे. त्यामुळे जो पर्यंत शासन मनपा आयुक्त यांच्या प्रस्तावावर श्री. आर.बी. ओगले यांची बाजु ऐकुण घेऊन नव्याने आदेश परीत करीत नाही तो पर्यंत व होणाऱ्या आदेशाच्या अधिन राहुन श्री. राहुल ओगले यांना कामावर घेण्यास हरकत नाही. असे मत विधीतज्ञांनी दिले आहे.

श्री. राहुल ओगले यांना कामावर रुजु करुन घेणेकरीता मा. सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान करावी ही विनंती.

उपरोक्त प्रशासकिय प्रस्तावावर ही सभा सहाय्यक आयुक्तांचे नियुक्ती प्राधिकरण म्हणून सर्वानुमते श्री. राहुल बापुराव ओगले यांना सहाय्यक आयुक्त या पदावर पुर्वव्रत रुजु करण्यास मान्यता देत आहे. तसेच राहुल ओगले सहा. आयुक्त यांचा उपरोक्त कालावधीतील वेतन, भत्ते, वैद्यकिय परीपुर्ती, थकबाकी इत्यादी सेवालाभ अदा करुन प्रकरण अंतिमरित्या नस्तीबंद करण्याचा निर्णय घेते.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम.

स्वा/-
नगरसचिव
महानगरपालिका,अमरावती.

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका,अमरावती.

**<u>दिनांक १६.४.२०१८ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित व त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा.</u>**

**<u>विषय क्रमांक ३१</u>**:- महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधील कलम ३० अन्वये (१)विधी समिती (२)शहर सुधार समिती (३) माध्यमिक,पूर्वमाध्यमिक व तांत्रिक शाळा समिती व(४) महिला व बालकल्याण समितीवर प्रत्येकी ९(नऊ) सदस्याची नियुक्ती करणे.

**विधी समिती**

१. सौ.संगीता बुरंगे, भारतीय जनता पार्टी
२. सौ.प्रमिला जाधव, भारतीय जनता पार्टी
३. श्री.धिरज हिवसे, भारतीय जनता पार्टी
४. सौ.इंदु सावरकर, भारतीय जनता पार्टी
५. श्री.अजय सारसकर, भारतीय जनता पार्टी
६. श्री.प्रशांत डवरे,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
७. श्रीमती हफिजाबी युसूफशहा, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८. श्री.अब्दुल खालिक शेख इब्राहीम, अेआयएमआयएम
९. श्री.भारत चौधरी, शिवसेना

**शहर सुधार समिती**

१. श्री.राजेश साहु, भारतीय जनता पार्टी
२. सौ.रेखा भुतडा, भारतीय जनता पार्टी
३. श्री.श्रीचंद तेजवाणी, भारतीय जनता पार्टी
४. सौ.सुनंदा खरड, भारतीय जनता पार्टी
५. सौ.स्वाती कुळकर्णी, भारतीय जनता पार्टी
६. श्री.प्रदिप बाबुराव हिवसे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
७. सौ.निलिमा अनिल काळे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८. श्री.मोहम्मद साबीर शेख साबीर, अेआयएमआयएम
९. डॉ.राजेंद्र तायडे, शिवसेना

**माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती**

१. सौ.पद्मजा कौंडण्य, भारतीय जनता पार्टी
२. श्री.प्रणित सोनी,भारतीय जनता पार्टी
३. सौ.निता राऊत, भारतीय जनता पार्टी
४. श्री.गोपाल धर्माळे,भारतीय जनता पार्टी
५. श्री.संजय वानरे, भारतीय जनता पार्टी
६. सौ.मंजुश्री प्रशांत महल्ले, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
७. सौ.वंदना महेंद्र कंगाले, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८. श्री.अफजल हुसेन मुबारक हुसेन, अेआयएमआयएम
९. जयश्री कुऱ्हेकर,शिवसेना

**महिला व बालकल्याण समिती**

१. सौ.स्वाती जावरे, भारतीय जनता पार्टी
२. सौ.पंचफुला चव्हाण, भारतीय जनता पार्टी
३. सौ.नुतन भुजाडे,भारतीय जनता पार्टी
४. सौ.वंदना हरणे, भारतीय जनता पार्टी
५. सौ.सोनाली नाईक, भारतीय जनता पार्टी
६. श्रीमती अस्मा फिरोजखान, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
७. सौ.सुनिता मनोज भेले, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८. श्रीमती नजमुन्नीसा सैय्यद महेमुद,अेआयएमआयएम

९. सौ.अर्चना धामणे, शिवसेना

उपरोक्त समिती सदस्यांची घोषणा करण्यात येऊन नवनियुक्त समिती सदस्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

ठराव सर्वानूमते मंजूर.

**मा.सभापती- अेआयएमआयएम पक्षाचे गटनेते श्री.अ.नाजीम अ.रऊफ यांचेवतीन पत्र प्राप्त झाले असून त्यांनी वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य म्हणून आपण आपला राजीनामा देत असून त्यांचे जागी श्री.शेख मोहम्मद इमरान अ.सईद यांची निवड करण्यात यावी अशी विनंती केली आहे. त्यानूसार वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य श्री.शेख मोहम्मद इमरान अ.सईद यांचे नावाची घोषणा करुन त्यांची निवड करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| नगरसचिव | सभापती तथा महापौर, |
| महानगरपालिका,अमरावती. | महानगरपालिका,अमरावती. |